# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:08.11.2025** **वार:शनिवार**

---

1. वंदे मातरम गीताच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाचं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन; वंदे मातरम हा मंत्र; उर्जा, स्वप्न आणि संकल्पाचं प्रतिक असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. राज्यात सर्वत्र वंदे मातरम गीताचं सामूहिक गायन; विविध उपक्रमांचंही आयोजन
3. यंदाचा इफ्फी 20 नोव्हेंबरपासून गोव्यात रंगणार; महिलांनी दिग्दर्शित केलेल्या 50 चित्रपटांचं होणार प्रदर्शन आणि
4. विश्वविजेत्या भारतीय महिला क्रिकेट संघातील राज्यातल्या खेळाडूंचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार

**वंदेमातरम**

स्वातंत्र्यपूर्व काळात देशभक्तांचा प्रेरणास्रोत असलेल्या आणि आजही प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करणाऱ्या वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाची सुरुवात काल झाली. ऐकुया याबाबतचा सविस्तर वृत्तांत....

**प्रत्येक भारतवासीयासाठी हा देश म्हणजे इथली जमीन नाही, तर ती त्याची माता आहे आणि हीच भावना बंकिमचंद्र चटर्जी यांच्या वंदे मातरम या गीतात पुरेपूर उतरली आहे. पारतंत्र्याच्या काळात लिहिलेल्या ह्या गीताने प्रत्येक भारतीयाच्या मनात मातृभू ला स्वतंत्र करण्याचे स्फुल्लिंग चेतवले. या गीतास दीडशे वर्ष पूर्ण झाल्याबद्दल काल देशभरात या गीताचे समूहगान करण्यात आले, आणि हे समूहगान प्रत्येक नागरिकाच्या मनात हर्ष आणि उल्हासाबरोबरच मातृभूमीचे प्रेम जागवणारे ठरले.**

**या गीतास दीडशे वर्ष पूर्ण झाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीत एक वर्षभर चालणाऱ्या स्मरण उत्सवाचं उद्घाटन केलं. पंतप्रधानांनी यावेळी एका टपाल तिकिटाचं आणि एका विशेष नाण्याचं अनावरणही केलं. तसंच 'vandemataram150.in' हे विशेष पोर्टलही सुरू केलं. वंदे मातरम हा एक मंत्र असून तो एक उर्जा स्वप्न आणि संकल्प यांचं प्रतिक असल्याचं पंतप्रधान यावेळी बोलतांना म्हणाले.....**

***वंदे मातरम का मूल भाव है। भारत मां भारती भारत की शाश्वत संकल्पना वह संकल्पना जिसने मानवता के प्रथम पहर से खुद को गढना शुरू कर दिया जिसने युगों-युगों को एक-एक अध्याय के रूप में पढ़ा शून्य से शिखर तक उनकी यात्रा और शिखर से पुन: शून्य में उनका विलय भारत ने यह सब कुछ देखा है।***

**राज्यातही या निमित्तानं सर्वत्र कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबईत मंत्रालयाच्या त्रिमुर्ती प्रांगणात या गीताचं समूहगान करण्यात आलं. देशाचा समृद्ध वारसा जागवून एकात्मता आणि राष्ट्रभक्ती यावर भर देण्याचा निर्धार यावेळी फडणवीस यांनी केला. ते म्हणाले......**

***विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत, नालंदा आणि तक्षशिला सारख्या विश्वविद्यालयाच्या माध्यमातनं जगाला ज्ञान देणारा भारत, भगवान गौतम बुद्धाचं तत्वज्ञान संपूर्ण विश्वात नेणारा भारत, अशा प्रकारचा भारत हा पुन्हा तयार करण्याकरता विकास भी और विरासत भी अशा प्रकारची जी भावना प्रधानमंत्री महोदयांनी मांडलेली आहे. त्याच्याकडे वाटचाल करण्याकरता संकल्पबद्ध होण्याचा दिवस म्हणजे आजचा दिवस आहे तो संकल्प म्हणजे वंदे मातरम आहे.***

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तसंच उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनीही वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताला अभिवादन केलं. हे गीत राष्ट्र भावना जागवणारं आणि अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारं शाश्वत गीत आहे, असं राधाकृष्णन यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.**

**संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान यांनीही या राष्ट्रीय गीताचं स्मरण केलं. हा कार्यक्रम राष्ट्राचा सन्मान, त्याग आणि कर्तव्याप्रति समर्पित राहण्याची वचनबध्दता दाखवतो, असं संरक्षण मंत्रालयाच्या संदेशात म्हटलं आहे.**

**सर्व शासकीय-निमशासकीय कार्यालयं, अस्थापना, शाळा, महाविद्यालयं, विद्यापीठात वंदे मातरम गीताचं सामूहिक गायन करण्यात आलं, वंदेमातरमला समर्पित विशेष सभा, निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, पोस्टर तयार करणे, आदी उपक्रम राबविण्यात आले. अनेक ठिकाणी दीपोत्सव साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यपूर्व काळात लिहिलेल्या या गीतातून काल प्रत्येक भारतीयानी आपल्या सुखदायिनी, वरदायिनी देशाला या समूह गानाच्या माध्यमातून वंदन केलं. आणि वंदे मातरम हे केवळ एक गीत नाही तर तो एक मंत्र आहे, हेच दाखवून दिलं.**

**इफ्फी**

गोव्यात 20 नोव्हेंबरपासून होणारा इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा भारतीय निर्मात्यांना जगाशी जोडणारा पूल ठरेल, असं मत माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन यांनी व्यक्त केलं. ते काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. यंदाच्या इफ्फीमध्ये 81 देशातले 240 चित्रपट दाखवले जाणार असून एआय आणि एआय आधारित आशय या विशेष विभागाचा समावेश करण्यात आला आहे. महिलांनी दिग्दर्शित केलेले 50हून अधिक चित्रपट हे या वर्षीचं आणखी एक आकर्षण ठरेल, असं मुरुगन म्हणाले.

**शिवराजसिंग**

दुष्काळी भागात मनरेगाचा 65 टक्के निधी पाणी पुरवठा योजनांसाठी खर्च केला जाईल, अशी घोषणा केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केली आहे. ते काल बीड जिल्ह्यात शिरसाळा इथं शेतकरी संवाद मेळाव्यात बोलत होते. शेतकऱ्यांचं उत्पन्न एवढं वाढवायचं आहे की, एकाही शेतकऱ्याला आत्महत्या करावी लागू नये, हे आपलं उद्दीष्ट असल्याचं चौहान यांनी सांगितलं.

**कृषी समृद्धी**

राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी कृषी समृद्धी योजने अंतर्गत अनुदान देण्याचा निर्णय शासनानं घेतला आहे. यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे.

**गुन्हे-मुख्यमंत्री**

नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीचा गुन्हे सिद्धतेमध्ये चांगला उपयोग होत आहे, असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत व्यक्त केलं. या संदर्भात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. नागपूर आणि वर्धा

इथं नवीन कारागृह निर्मितीचा प्रस्ताव सादर करण्या च्या सूचना फडणवीस यांनी यावेळी दिल्या. नागरिक केंद्रीत सेवा देण्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत आग्रही सूचना केली.

**अजित पवार**

पुण्यातील कथित जमीन गैरव्यवहार प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल मुंबईत माध्यमांना माहिती दिली. याबाबत कुठलाही आर्थिक व्यवहार झालेला नाही; तसंच जमिनीचा ताबाही घेण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे पार्थ पवार याने तो करार रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे, असं अजित पवार यांनी सांगितलं. या प्रकरणाच्या सखोल चौकशीनंतर सत्य समोर येईल; कोणी दोषी आढळल्यास योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल, असं ते म्हणाले.

**निवडणुक**

राज्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर न करण्याच्या राज्य निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठासमोर काल सुनावणी झाली. याबाबत न्यायालयानं राज्य निवडणूक आयोगाला नोटिस बजावली असून पुढच्या आठवड्यापर्यंत आपलं म्हणणं मांडण्याचे निर्देश दिले आहेत. काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव प्रफुल्ल गुडघे यांनी ही याचिका दाखल केली आहे, त्यावर न्यायमूर्ती अनिल किलोर यांच्या पीठासमोर काल सुनावणी झाली.

**महिला क्रिकेट**

भारताला विश्वचषक जिंकून देणाऱ्या महिला क्रिकेट संघाचा विजय क्रीडा क्षेत्रात येणाऱ्या अनेक मुलींसाठी प्रेरणादायी ठरेल, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. विश्वविजेत्या महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मानधना, जेमिमा रॉड्रिग्ज, राधा यादव आणि प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांचा काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला; त्यावेळी ते बोलत होते. यावेळी तीनही खेळाडूंना प्रत्येकी सव्वा दोन कोटी रुपयांचा धनादेश तर अमोल मुजुमदार यांना साडेबावीस लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. महिला क्रिकेट संघाच्या सहाय्यक कर्मचारी वर्गालाही 11 लाख रुपयांचा धनादेश
देण्यात आला.

**क्रिकेट सामना**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील 20 षटकांच्या क्रिकेट मालिकेतील पाचवा आणि शेवटचा सामना आज ब्रिस्बेनमध्ये होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी पावणे दोन वाजता हा सामना सुरू होईल.

**सुलक्षणा पंडित**

ज्येष्ठ अभिनेत्री सुलक्षणा पंडित यांच्यावर काल मुंबईत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचं गुरुवारी दीर्घ आजारानं निधन झालं; त्या 71 वर्षांच्या होत्या. संगीताच्या वारसा घरातूनच मिळालेल्या सुलाक्षणा पंडित यांनी पार्श्वगायनानं आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली होती. त्यानंतर अभिनयाच्या क्षेत्रात पाउल ठेवत त्यांनी विविध हिंदी चित्रपटांमधून भूमिका साकारल्या.

**हवामान**

राज्यात सर्वत्र हवामान कोरडं आहे. विदर्भात काही ठिकाणी पारा घसरण्यास सुरवात झाली असून थंडीची चाहूल लागण्यास सुरवात झाली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**